# शेळयांच्या विविध जातींची अशी करा निवड



डॉ. क्रांती खारकर
(मो.नं. ९९२१५९४५७७)
डॉ. दीपक काळे
डॉ. डी.व्ही. पाटील
डॉ. किशोर कुरुडे
पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर



आपल्या देशात सर्वत्र शेतीला पूरक असे पशुपालनाचे जोडधंदे उभे राहिल्यास ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था निश्चितपणे बदलेल. यादृष्टीने बेरोजगार, अल्पभूधारक, शेतमजूर, भूमिहीन मजूर आणि ग्रामीण महिलांनी शेळीपालनाचे काम हाती घेतल्यास दुधाची स्थानिक गरज भागेल आणि त्यांना वर्षभर काम मिळेल. त्याचप्रमाणे बोकड, शेळया विकून आर्थिक गरजाही पूर्ण करता येतील.

अगदी प्राचीन काळापासून कमी उत्पन्न गटातील लोक घरगुती पद्धतीने एक-दोन शेळ्या पाळीत आले आहेत. आतापर्यंत या व्यवसायाकडे पाहिजे तेवढे लक्ष दिले गेले नाही. परंतु गेल्या ८-९ वर्षांपासून हा कमी भांडवलामध्ये खात्रीने आर्थिक उत्पन्न मिळवून देणारा व्यवसाय असल्याचे लक्षात आल्याने; लहान शेतकऱ्यांपासून मोठे शेतकरी तसेच शेतमजूर, द्रारिद्र्यरेषेखालील कुटुंबे व सुशिक्षित बेरोजगार हे सुद्धा शेळीपालनाकडे आकर्षित झालेले आहेत. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात हा व्यवसाय फक्त जोडधंदा म्हणून न राहता स्वतंत्र व्यवसाय बनला आहे. शेळीपालन कमी जोखमीचा व फायदेशीर व्यवसाय आहे. शेतीला पूरक असणाऱ्या अनेक व्यवसायांत शेळीपालनाचे एक मुख्य स्थान आहे. शेळीपालनापासून मुख्यतः मांस व दुधाचे उत्पादन तर मिळतेच, परंतु याबरोबरच शिंगे व खुरे यांपासून डिंकासारखे पदार्थ, लहान आतड्यापासून शस्त्रक्रियेत टाके घालण्यासाठी दोरा (कॅट गट), हाडांपासून खत, खनिज मिश्रण, शेणखत, कातडीपासून उच्च प्रतीचे चामडेही मिळते. तसेच काश्मिरी जातीच्या शेळ्यांपासून 'पश्मिना' नावाची व अंगोरा जातीच्या शेळ्यांकडून 'मोहेर' नावाची लोकर मिळते.

१९ व्या पशुगणनेनुसार भारतातील शेळ्यांची संख्या सुमारे १३५ दशलक्ष इतकी असून, महाराष्ट्रात शेळ्यांची संख्या ८४ लाख आहे. भारतात शेळ्यांच्या एकूण ३४ जाती असून महाराष्ट्रात ४ जाती आढळून येतात व त्यांची नोंदणी राष्ट्रीय पशु आनुवंशिक संसाधन ब्युरो, कर्नाल येथे करण्यात आलेली आहे. या चार जातींमध्ये उस्मानाबादी, संगमनेरी, बेरारी आणि कोकण कन्याळ या शेळ्यांचा समावेश आहे.

**देशातील शेळ्यांच्या जाती**

**अ)** पर्यावरणी प्रदेशानुसार

१) हिमालयीन पर्वत रांगा : गड्डी, चेगू आणि चांगथांगी.

२) उत्तर पश्चिम विभाग : बिटल, कच्छी, झालवाडी, बारबेरी, जमुनापारी.

३) दक्षिण विभाग : उस्मानाबादी, कन्नीअड्डू, मलबारी, संगमनेरी.

४) पूर्व विभाग : बंगाली, गंजम.

**ब)** आकारमानानुसार वर्गीकरण

१) मोठ्या आकाराच्या शेळ्या : जमुनापारी, बिटल, जाखरणा, झालवाडी, सिरोही.

२) मध्यम आकाराच्या शेळ्या : मारवाडी, कच्छी, सुरती, बारबरी, मेहसाणा, गोहीलवाडी, कन्नीअड्डू, मलबारी, संगमनेरी, उस्मानाबादी, गंजम, चांगथांगी, चेगू आणी गड्डी.

३) लहान आकाराच्या शेळ्या : बंगाली.

**क)** शेळ्यांपासून मिळणाऱ्या उत्पादनानुसार शेळ्यांचे प्रकार


१) दूध व मांस (दुहेरी उद्देश) : जाखरणा, बिटल, जमुनापारी, सुरती, बारबरी.

२) मांसोत्पादनासाठी : सिरोही, मारवाडी, झालवाडी, गोहीलवाडी, कच्छी, मेहसाणा, मलबारी, उस्मानाबादी, संगमनेरी, कन्नीअड्डू, बंगाली, गंजम.

३) लोकर उत्पादनासाठी : चांगथांगी, चेगू व गड्डी.


**भारतातील दुधाळ शेळ्यांच्या जाती**

१) **जमुनापारी** : उत्तर प्रदेशातील गंगा, यमुना व चंबळ नद्यांच्या खोऱ्यात व इटावा जिल्ह्यात ही जात प्रामुख्याने आढळते. भारतामध्ये आढळणाऱ्या शेळ्यांमध्ये ही जात सर्वात अधिक देखणी व उंच आहे, तसेच उत्तम दुधाळ व मांसासाठी प्रसिद्ध आहे.



शेळ्या रंगाने मुख्यतः पांढऱ्या असून, तोंडावर व मानेवर तपकिरी रंगाचे तपकिरी रंगाचे ठिपके आढळतात. या शेळीचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे उठावदार असलेले 'रोमन नाक' होय. कान खूप लांब, चपटे व लटकणारे असतात. शिंगे चपटी, लहान व मागील बाजूला वळलेली असतात कास मोठी असून सड लांब असतात. बोकडाला दाढी असते. या जातीच्या नराचे वजन ५० ते ६० किलो तर मादीचे वजन ४० ते ५० किलोपर्यंत असते. या जातीतल्या उत्कृष्ट शेळीचे दूध उत्पादन दररोज ४ ते ५ किलोग्रॅमपर्यंत असते. परंतु प्रतिदिन सरासरी दूध उत्पादन २ ते ३ किलोग्रॅम असते. (पशुपालन क्षेत्रातील शास्त्रीय परिभाषेत दुधाचे परिमाण किलोग्रॅममध्ये मोजण्याचा प्रघात आहे. त्यामुळे हा उल्लेख प्रत्येक ठिकाणी त्यानुसार केला आहे.) साधारणतः जमुनापारी शेळी वर्षातून एकदाच पिलांना जन्म देते.

२) **बारबेरी** : या जातीच्या शेळ्या उत्तर प्रदेशमधील आग्रा, मथुरा, इटावा जिल्ह्यांत तसेच राजस्थानमधील भरतपूर जिल्ह्यात आढळतात. ही शरीराने मध्यम आकाराची शेळी असून या शेळ्यांच्या रंगामध्ये खूप प्रकार आहेत. परंतु पांढऱ्या रंगावर बदामी रंगाचे ठिपके असलेल्या शेळ्या प्रामुख्याने आढळतात. कान लहान व उभे असतात,




शिंगे मध्यम असून वर जाऊन मागे वळलेली असतात. या शेळ्यांची प्रजननक्षमता फार चांगली असून, एका वेतात दोन किंवा तीन पिल्ले देण्याचे प्रमाण अधिक आहे. या जातीच्या शेळ्या प्रतिदिन सरासरी १.५ ते २ किलोग्रॅमपर्यंत दूध देतात. वयस्क बोकडाचे वजन ३५ ते ४५ किलो तर मादीचे वजन २५ ते ३५ किलोपर्यंत असते. बारबेरी जातीच्या शेळ्यांचे संगोपन बंदिस्त पध्दतीने करता येणे शक्य असल्यामुळे या शेळ्या शहरात सुद्धा पाहायला मिळतात.

३) **बिटल :** या जातीच्या शेळ्या पंजाबच्या गुरुदासपूर, अमृतसर, फिरोजपूर या जिल्ह्यांत तसेच हरियाणा राज्यात



आढळतात. बिटल शेळी ही जमुनापारी जातीप्रमाणे दिसणारी; परंतु आकाराने व वजनाने लहान असते. या जातीच्या शेळ्यांमध्ये ठराविक रंग आढळून येत नाही. मुख्यतः ९० टक्के शेळ्या काळ्या व १० टक्के शेळ्यांत तपकिरी रंग व त्यावर विविध आकारांचे ठिपके असतात. बोकडाला दाढी असते, परंतु मादीस दाढी नसते. बिटलचे प्रतिदिन दूध उत्पादन २ ते ३ किलोग्रॅमपर्यंत असते. बोकडाचे वजन ५० ते ६५ किलोग्रॅमपर्यंत असते.

४) **सुरती :** गुजरात राज्याच्या सुरत व बडोदा जिल्ह्यांत या जातीच्या शेळ्या आढळतात. आकाराने मध्यम व कास चांगली विकसित झालेली असते. कान मध्यम आकाराचे तर शिंगे लहान, पाठीमागे वळलेली असतात. सुरती शेळ्यांना लांब अंतर चालणे जमत नाही व बंदिस्त पद्धतीने चांगल्या



वाढतात. या शेळ्या झाडपाल्यावर किंवा वाया गेलेल्या अन्नावर जगू शकतात. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या त्यांचे संगोपन करणे फायदेशीर आहे. या शेळ्यांचे सरासरी दूध उत्पादन १ ते २ किलोग्रॅम प्रतिदिन असते.


५) **जाखराणा :** राजस्थानातील जाखराणा जिल्ह्यात व अलवार जिल्ह्याच्या आसपासच्या परिसरात या शेळ्या आढळतात. जाफराणा जातीच्या शेळ्या मऊ, उंच असून



दुधासाठी प्रसिद्ध आहेत. शेळ्यांचा रंग काळा असून, कानावर व नाकावर पांढरे ठिपके असतात. कपाळ उंच व कास चांगली विकसित असते. या शेळीचे दूध उत्पादन २ ते ३ किलोग्रॅम प्रतिदिन असते. नराचे सरासरी वजन ५५ किलोग्रॅम आणि मादीचे वजन ४५ किलोग्रॅम असते.

**भारतातील मांसल शेळ्यांच्या जाती**

१) **बंगाली :** या प्रजातीच्या शेळ्या भारताच्या संपूर्ण पूर्व भागात आढळतात. या शेळ्या आकाराने लहान आहेत. मांस व कातडी अतिशय उत्कृष्ट दर्जाची असते. शेळ्यांमध्ये मुख्य रंग काळा आहे. परंतु लाल व पांढऱ्या रंगाच्याही शेळ्या आढळतात. छाती रुंद, कान टोकदार व पुढील



बाजूस निघालेले, केस मऊ व आखूड ही या शेळयांची वैशिष्टचे आहेत. दोनपेक्षा अधिक पिल्ले देण्याची क्षमता या शेळ्यांमध्ये आहे. या शेळ्या फार लवकर वयात येतात. वयस्क नराचे वजन १५ ते ३० किलोग्रॅमपर्यंत तर मादीचे वजन १४ ते २० किलोग्रॅमपर्यंत असते. नर व मादी या दोन्हींमध्ये दाढी असते.



२) **गंजम :** या शेळ्या ओरिसा राज्याच्या गंजम व करपत जिल्ह्यांत आढळतात. शेळ्या उंच व विभिन्न रंगाच्या असतात. परंतु काळ्या रंगाच्या शेळ्या पांढऱ्या व तपकिरी रंगापेक्षा जास्त आढळतात. शरीरावर केस आखूड व मऊ असतात. शिंगे

एकमेकास समांतर, लांब व मागे वळलेली असतात. वयस्क नर व मादीचे सरासरी वजन क्रमशः ४४ किलो व ३१ किलो असते.


३) **मालवारी** : केरळ राज्यात मालावर, कालिकत, कन्नोर, मालपूरम जिल्ह्याच्या भागात या शेळ्या आढळतात. या प्रजातीच्या शेळ्यांमध्ये ठराविक असा पांढरा रंग आढळून येतो. परंतु पूर्ण पांढरा, तपकिरी, काळा या रंगाच्या मिश्रणाच्या शेळ्या आढळतात. शेळ्या मध्यम आकाराच्या असून, डोळे सपाट व कान सुद्धा मध्यम आकाराचे असतात. या शेळ्या मुख्यतः मांसासाठी पाळल्या जातात. सर्व नरांचे व काही माद्यांचे वजन अनुक्रमे ३८ ते ३९ किलो असते.




४) **उस्मानाबादी** : या जातीच्या शेळ्या महाराष्ट्रातील उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यांत आढळतात. आकाराने मध्यम व रंगाने काळ्या असतात तर काही शेळयांच्या कानावर, मानेवर तर कधी कधी शरीराच्या काही भागावर पांढरे ठिपके दिसतात. शरीरावरील केस छोटे व चमकदार असतात. कान मध्यम आकाराचे व लोंबकळणारे असतात व कधी कधी कानावर पांढऱ्या- काळ्या रंगाचे ठिपके दिसून येतात. ९० टक्के नरांमध्ये शिंगांचे प्रमाण जास्त असून, बिनशिंगांच्या माद्या आढळून येतात. शिंगे चपटी व मागे वळलेली आढळतात. कपाळ पुढे आलेले दिसते. कास ही छोट्या आकाराची असते. उस्मानाबादी शेळीत जुळी पिल्ले निपजण्याचे प्रमाण ५१ टक्के व तिळे देण्याचे प्रमाण १० टक्के एवढे असते. मोठ्या उस्मानाबादी शेळीचे वजन ३०-३५ किलो व बोकडाचे वजन ४५ ते ५० किलो एवढे असते.



५) **संगमनेरी** : महाराष्ट्रातील पुणे व अहमदनगर जिल्ह्यांत या जातीच्या शेळ्या आढळतात. या शेळ्या मध्यम आकाराच्या असून, एकाच रंगाच्या शेळ्या आढळून येत नाहीत. कान लटकणारे, शिंगे उभी व मागे वळलेली असतात. या जातीच्या नराचे सरासरी वजन ३८ किलो व मादीचे वजन सरासरी २९ किलो असते.



६) **बेरारी** : बेरारी जातीच्या शेळया महाराष्ट्राच्या विदर्भातील अकोला, यवतमाळ, वाशिम, अमरावती व बुलढाणा जिल्ह्यांत तसेच नागपूर व वर्धा जिल्ह्यांत सुद्धा आढळतात. या जातीच्या शेळया उंच व फिकट ते गडद तांबड्या रंगाच्या असतात. वयस्क नरांच्या मानेभावती काळ्या रंगाच्या केसांचा पट्टा आढळून येतो. शिंगे लांब, चपटी व मागे वळलेली असतात. कान लांब व लटकणारे असतात. या जातीच्या नराचे सरासरी वजन ३५ किलो आणी मादीचे सरासरी वजन ३० किलो असते.



७) **सिरोही** : ही जात द्विहेतुक म्हणजे दूध व मांस उत्पादनात चांगली आहे. राजस्थानातील सिरोही अजमेर भागात या शेळ्या आढळतात. या शेळयांचा बांधा मजबूत असून, आकाराने मध्यम असतात. शरीरावर छोटे व राठ केस असतात. कान हे चपटे, पानासारखे मध्यम आकाराचे व लटकणारे असतात. शेळ्यांची शिंगे छोटी असून, वर जाऊन मागे वळलेली असतात. एक शेळी एका दिवसात सरासरी ०.६ किलोग्रॅम दूध देते. नराचे सरासरी वजन ५० किलो व मादीचे सरासरी ४० किलो असते.



**भारतातील मोहेर उत्पादन करणाऱ्या शेळयांच्या जाती**

१) **गड्डी** : या शेळ्या हिमाचल प्रदेशातील चंबा, कांग्रा, कुलू, बिलासपूर, किन्नोर, चाहूल व स्पिती भागात आणि

जम्मूच्या पहाडी भागात आढळतात. या शेळ्या मुख्यतः पांढऱ्या रंगाच्या असतात. याशिवाय काळा, तपकिरी किंवा मिश्र रंग सुद्धा असतो. कातडी अतिशय राठ असून, अंगावर ७ ते १० इंच लांबीचे खरखरीत केस असतात. कान मध्यम आकाराचे लांब व लटकणारे असतात. या शेळ्यांचे शरीर पिळदार व मजबूत असते. तसेच सहजासहजी लांब अंतर फिरू शकतात. नर व मादीचे सरासरी वजन क्रमश: २७ व २५ किलो एवढे असते. या शेळ्यांपासून एकावेळी साधारणत: ३०० ग्रॅमपर्यंत केस मिळतात.



२) **चांगथांगी** : या जातीच्या शेळ्या लेह, लद्दाख व हिमाचल प्रदेशाच्या चाहूल अथवा स्पिती घाटात मुख्यतः पाळल्या जातात. या शेळ्यांच्या तोंडावरील लांब कुरळे केस संपूर्ण चेहरा झाकून टाकतात. खांद्याच्या बाजूच्या भागावर लांब धाग्याच्या, अतिशय मऊ व गरम, उत्तम प्रतीचा पश्मिना प्राप्त होतो. म्हणून या शेळीला पश्मिना सुद्धा म्हणतात. या शेळ्या मध्यम आकाराच्या असून, बहुतांश शेळ्या पांढऱ्या रंगाच्या असतात. परंतु काही शेळ्या काळ्या व तपकिरी रंगाच्या आढळतात. शिंगे अर्धवर्तुळाकार असतात. कान लांब व लटकणारे असतात. शेळ्या चपळ व फार जलद हालचाल करणाऱ्या आहेत व उंच भागात सामानाची ने-आण करण्यासाठी उपयोगात येतात. वयस्क नराचे व मादीचे सरासरी वजन क्रमश: २० किलो व १८ किलो असते. एका शेळीपासून प्रतिवर्षी २१५ ग्रॅम पश्मिना मिळतो.

३) **चेगू** : या जातीच्या शेळ्या हिमाचल प्रदेशच्या चाहूल व स्पिती घाटातील व उत्तराखंडच्या उत्तर काशी, चामोली व पितोरगड जिल्ह्यात आढळतात. या शेळ्या मध्यम आकाराच्या असून पांढऱ्या रंगाच्या किंवा पांढऱ्या व तपकिरी रंगाच्या मिश्रणात असतात. शिंगे अर्धवर्तुळाकार असतात. वयस्क नराचे व मादीचे सरासरी वजन क्रमश: ३७ किलो व २५ किलो असते. एका शेळीपासून प्रतिवर्षी १२० ग्रॅम पश्मिना मिळतो. शेळीच्या मांसात चरबीचे प्रमाण इतरांच्या तुलनेत फारच कमी असल्यामुळे आहारात त्याला विशेष महत्त्व आहे. म्हणूनच आज संपूर्ण जगात शेळीच्या मांसाची मागणी वाढत चालली आहे. कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त उत्पन्न मिळविण्याकरिता शास्त्रीय पद्धतीने शेळीपालन करणे आज अत्यंत आवश्यक झाले आहे. तेव्हाच 'लाल क्रांती' म्हणजेच मांस उत्पादनासाठी संगोपन यशस्वी होऊ शकते.

मांसासाठी शेळीपालन करण्यासाठी वजनदार शेळ्यांच्या जातींची निवड आवश्यक असते. ही गोष्ट लक्षात घेऊन शेळ्यांची निवड करावी. ज्या शेळ्यांमध्ये जुळी- तिळी करडे मोठ्या प्रमाणात मिळतात अशा शेळ्यांची निवड करणे फायदेशीर होईल. ब्लॅक ब्रँगल, सिरोही, मलबारी उस्मानाबादी शेळी मांसाकरिता उत्तम आहे.

**शेळ्यांच्या जातींची निवड :** जर स्थानिक शेळ्यांच्या जातीत उच्च उत्पादन असणाऱ्या शेळ्या उपलब्ध असतील तर त्यातून उत्कृष्ट नर व मादीची निवड करावी. त्यामुळे त्यांच्या पुढील पिढीत आपल्याला अपेक्षित बदल पाहायला मिळतील. शेळीची निवड करताना आपला मूळ हेतू कोणता आहे हे लक्षात घ्यायला पाहिजे. आपल्याला मांसोत्पादनासाठी शेळीपालन करायचे असले तर जन्मतः अधिक वजनाची करडे देणाऱ्या, झटपट वाढणाऱ्या मादी व नराची निवड करावी. तसेच दुग्धोत्पादनासाठी शेळीपालन करायचे असल्यास पैदास करतेवेळी दूध देणाऱ्या शेळ्यांची निवड करावी. शेळीपालनाचे यश पैदाशीसाठी वापरलेली शेळी व बोकड यावर अवलंबून आहे.

**संगोपनासाठी शेळीची निवड :** १) शेळीची निवड करताना तिचे गुणधर्म पाहून अतिशय काळजीपूर्वक करावी. २) एकदा वीत झालेली (व्यालेली) शेळी विकत घेणे चांगले असते. तिची आई जुळे करडे देणारी असेल तर अशा शेळीची पैदास विकत घेणे चांगले असते. ३) शेळी ही निरोगी, धष्टपुष्ट व सशक्त असावी. जन्मतः वजनदार व दोन पिल्ले देणारी असावी. ४) शेळी आकाराने मोठी असावी. तिची मान लांब असावी. केस मऊ व चमकदार दिसणारे असावेत. छाती भरदार असावी. खांदा मोठा असावा, जेणेकरून दोन किंवा अधिक करडांना आपल्या गर्भाशयात जोपासू शकेल. पाय सरळ, पिळदार व खूर (टाचा) उंच असावेत. ५) शेळीचे सर्व दात बळकट व सुस्थितीत असावेत. शक्यतो एक ते दोन वर्षे वयाचीच शेळी विकत घ्यावी. ६) शेळी विकत घेताना तिची कास नीट पारखून घ्यावी. तिला कासदाह तर नाही ना, याची तपासणी करावी. ७) दुधी शेळी निवडताना तिचे वय, करडांची संख्या, दुधाचे प्रमाण इत्यादी गोष्टींकडे लक्ष द्यावे. ८) दुधाट्या शेळीची धार काढून पाहावी. दूध काढल्यानंतर कासेचा आकार कमी व्हायला हवा. दुधाचे प्रमाण, दुधाचा रंग, कासेवर सूज या गोष्टी पारखून घ्याव्यात. ■